**नियमित दिवाणी दावा क्र. ३३१/२०१३**

(बंडू भोसले वि. दत्तात्रय शिंगटे व इतर)

**CNR No.MHSO07-001045-2013**

## <u>निशाणी क्र. ९८ खालील आदेश</u>

वादीने सदरचा अर्ज वादी क्र.५ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता झालेला विलंब माफ होऊन मिळणे करीता दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, वादी क्र.५ शांताबाई शिवाजी भोसले हया दि.२६/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे वारस रेकार्डवर घेण्यासाठी २३३ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादी क्र.५ च्या वारसांना दावा पुढे चालविण्याचा अधिकार असल्यामुळे सदरचा विलंब माफ करुन मिळणेसाठी हा अर्ज वादीने दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जाला म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली आहे.

३. दाव्याचे योग्य ते निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी वादी क्र.५ यांचे वारस रेकार्डवर असणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी क्र.५ यांचे वारस रेकार्ड वर घेणे उचित ठरते. परंतु तत्पुर्वी वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला २३३ दिवसांचा विलंब माफ करणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी क्र.५ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

Priyanka Namdev Pathade

Digitally signed by Priyanka Namdev Pathade
Date: 2024.01.06 17:52:18 +0530

(पी. एन. पठाडे)

दिनांकः– ०६.०१.२०२४ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 06.01.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 06.01.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 06.01.2024 |